PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Don bayka fajiti aika
Year: 1982

Song: Dhani ga kunkvacha
Lyricist: Jagdish Khebudkar

धनी गं कुंकवाचा
कसा रूसून गेला दूर
कशी लागली हुरहूर येड्या मना
माझा गं भरतार
मला घालून गेला गं कोडं
कशी लागली मला ओढ राम पारी
धनी गं कुंकवाचा
कशी मांडले चांडाळीनं
कुण्या जल्माची कैदाशीन झाले बाई
माझा गं भरतार
ढाण्या वाघाचं रूप होतं
मऊ मांजार केलं पुरतं मीच बाई

ओ... ओ... ओ...
ओ... ओ...
अहो ऐका हो ऐका फजिती ऐका
ऐका हो ऐका फजिती ऐका
ओ...
ज्यानं ज्यानं केल्या दोन बायका
ज्यानं ज्यानं केल्या दोन बायका
ज्यानं ज्यानं केल्या दोन बायका
ज्यानं ज्यानं केल्या दोन बायका
अहो ऐका हो ऐका फजिती ऐका

एका म्यानामधी दोन तलवारी
सांगा ऱ्हातील कशा
हो...

दोन्ही दरडीवर हात ठेवता
होती कशी दुर्दशा
मृदुंग नवऱ्याचा होई
दोन बाजूनं थपडा खाई
अन् भांड भांडती आब्रु काढती
लाज कुणाला हाय का
ओ...
ज्यानं ज्यानं केल्या दोन बायका
ज्यानं ज्यानं केल्या दोन बायका
अहो ऐका हो ऐका फजिती ऐका

श्री कृष्णाला सत्यभामा
आणि दुसरी होती रूक्मिनी
हो...
कुठल्या कुठं हो
पारिजात लावला त्यांनी अंगणी
झाड लावलं माझ्याकडं
मग फुलं का सवतीकडं
भांडाण ऐकून किसन देवाच्या
जीवाला बसला चटका
हो...
ज्यानं ज्यानं केल्या दोन बायका
अहो ऐका हो ऐका फजिती ऐका

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*